


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ०४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१९ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

**पाहिजेत !!** **राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४**

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.


**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**

# नांदेड जिल्ह्यात हाहाकार !







**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१८, नांदेड :** जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील सहा गावात मागील पंधरा पेक्षा जास्त तासापासून पूर परिस्थिती कायम आहे. ढगफुटी सदृश्य पाऊस आणि लेंडी धरणाला आलेला पुर आल्याने तालुक्यातील भिंगोली, भेंडेगाव, हसनाळ, रावणगाव, भासवाडी, सांगवी भादेव या गावांना पाण्याने वेढा घातला आहे. तीनशेहून अधिक नागरिक अडकले होते, त्यापैकी अनेकांना बाहेर काढून सुखरूप स्थळी हालवण्यात आले आहे. तर अद्याप ही शंभर हून अधिक नागरिक अडकून पडले आहेत. हसनाळ गावातील बेपत्ता असलेल्या पाच पैकी भीमाबाई मादाळे, गंगाबाई मादाळे या दोन महिलांचा १५ तासानंतर मृतदेह आढळला. तर पिराजी म्हैसाजी थोटवे, चंद्रकला विठ्ठल शिंदे, ललिताबाई भोसले यांचा शोध सुरु आहे.

जिल्ह्यात नांदेडसह सर्वच तालुक्यात मागील चार दिवसा पासून पावसाची रिपरिप आहे. शनिवारी रात्री हिमायतनगर, कंधार, किनवट, माहूर, लोहा यार तालुक्यात मुसळधार पाऊस बरसला. पैंनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे हिमायतनगर मध्ये शेती पिकाचे मोठे नुकसाने झाले. रविवारी रात्री मुखेड तालुक्यातील काही गावात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. लेंडी प्रकल्प ओव्हर फ्लो होऊन पाणी शिरल्याने भिंगोली, भेंडेगाव, हसनाळ, रावणगाव, भासवाडी, सांगवी भादेव आदी गावांना वेढा घातला आहे. गावात पूर आल्याने चाळीसहून अधिक जनावरे दगावल्याची माहिती आहे. दुसरीकडे गावात पूर आल्याने गावकऱ्यांनी जीव वाचवण्यासाठी काही जण झाडावर, मस्जिदीवर आणि घरावील छत, पत्रावर अडकून पडले होते. सकाळी एनडीआरएफ, एसडीआरएफ, अग्निशमन दल, क्यूआरटी, पोलीस दल गावात पोहचून बचाव कार्य सुरु केले.आता पर्यंत २०० जनाना पुराच्या पाण्यातून बाहेर काढून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. शंभर नागरिक अडकले असून बचावकार्य सुरु असल्याची माहिती आहे. १५ तास उलटूनही गावात बचावकार्य सुरु आहे. दरम्यान हसनाळ येथील पिराजी म्हैसाजी थोटवे, चंद्रकला विठ्ठल शिंदे, ललिताबाई भोसले, भीमाबाई हिरामन मादाळे, गंगाबाई गंगाराम मादाळे हे बेपत्ता होते, त्यापैकी भीमाबाई मादाळे आणि गंगाबाई मादाळे यांचा मृतदेह सायंकाळी शोधकार्य दरम्यान आढळला आहे.

**जिल्ह्यातील ९ मंडळांत अतिवृष्टी !**

नांदेड जिल्ह्यात चौथ्या दिवशीही पावसाचा कहर कायम असून गेल्या २४ तासात ९ महसुली मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मुखेडमधील बा-हाळी मंडळात ३५४.७५, मुक्रामाबाद २०६, देगलूरमधील मरखेल १५८, मालेगाव १२७.२५, हनेगाव १५८, किनवटमधील इसापूर १२०.२५, जलधारा ९०.७५, शिवणी ८०, नायगावम धील कुंटूर ७१.२५ मिली मीटर इतका पाऊस झाला आहे. जिल्हयात एकुण ३८.२० मिमी पाऊस झाला असून आत्तापर्यंत ५७९.३० मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे.

**मुख्यमंत्र्यांनी घेतला पूर परिस्थितीचा आढावा...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात नांदेडसह संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून यात सहभागी झाले. सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील माहिती यावेळी सादर केली. यावेळी नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील पूर परिस्थितीची माहिती घेतली. निवारा केंद्रात राहणाऱ्या नागरिकांना भोजन, शुद्ध पाणी, पांघरूण इत्यादी सोयी प्राधान्याने द्या, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले. मुखेडमधील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. विष्णुपुरीकडे लक्ष देण्यास सांगण्यात आले. शिवाय अलर्ट राहण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## विष्णुपुरी प्रकल्पाचे १० दरवाजे उघडले...



नांदेड जिल्ह्यात मागील तीन ते चार दिवसा पासून सातत्याने पाऊस सुरु आहे. विष्णुपुरी प्रकल्प शंभर टक्के भरल्याने प्रकल्पाचे दहा दरवाजे उघडण्यात आले आहे. विष्णुपुरी प्रकल्पातुन जवळपास १ लाख ४ हजार ८८२ क्यूसेस इतक्या वेगाने गोदावरी नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असून गोवर्धन घाट येथील स्मशानभूमी च्या काठापर्यंत पाणी पोहचले आहे. सद्या विष्णुपुरी प्रकल्पात पाण्याची आवक सुरु आहे, त्यामुळे प्रकल्पाचे आणखी काही दरवाजे उघडण्याची शक्यता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात दरवाजे उघडण्याची पहिली वेळ आहे. दरम्यान गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असल्याने जिल्हा प्रशासनाने नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## समुद्रातून येतंय मुंबईवर मोठं संकट...
## पुढच्या १२ तासांत तुफान पाऊस...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** संपूर्ण महाराष्ट्राला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्वच भागांत पावसाने जोर धरला आहे. विशेष म्हणजे आगामी काही दिवसांत पाऊस कायम राहणार असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईत तर स्थिती यापेक्षाही भयंकर आहे. मुंबईत जागोजागी रस्ते पाण्याने तुंबले आहेत. दरम्यान, याच मुंबईच्या पावसासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. आगामी काही तास मुंबईत पावसाचा जोर वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**फडणवीसांनी दिली सविस्तर माहिती !**

देवेंद्र फडणवीस आज माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यभरात पावसाची स्थिती कशी आहे? याची माहिती दिली. तसेच मुसळधार पावसामुळे होणारे नुकसान आणि त्यासाठी राज्य सरकारची तयारी याबाबतही त्यांनी सविस्तर सांगितले. यावेळी बोलताना त्यांनी मुंबईच्या पावसावरही भाष्य केले. आठ तासांत तब्बल १७० एमएम पाऊस

मुंबईचा विचार करायचा झाल्यास आज सकाळी सहा वाजेपूर्वीच्या ४८ तासांत जवळपास २०० एमएम पाऊस पडला. आणि आज सकाळपासून सहा ते आठ तासांत तब्बल १७० एमएम पाऊस पडला आहे. म्हणजेच मुंबईत प्रचंड पाऊस पडला आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

**दोन रस्त्यांवरील ट्रॅफिक थांबवलं**

चेंबूर भागात सर्वाधिक म्हणजेच १७७ एमएम पाऊस पाडलेला आहे. यावेळी पावसाचा विशेष जोर हा शहरभाग आणि पूर्वी उपनगरात दिसतो आहे. एकूण १४ ठिकाणी पाणी तुंबलेले आहे. यापैकी २ ठिकाणचे ट्रॅफिक थांबवण्यात आले आहे. बाकीच्या ठिकाणचे ट्रॅफिक चालू आहे. संपूर्ण मुंबईत ट्रॅफिक स्लो झालेले आहे, असेही यावेळी फडणवीस यांनी सांगितले.

**मुंबईला मिळाला रेड अलर्ट, आज शाळांना सुट्टी**

आज मुंबईला रेड अलर्ट देण्यात आला आहे. याबाबत बोलताना, कुठेही लोकल पूर्णपणे बंद झालेल्या नाहीत. काही गोष्टींमुळे लोकलचा वेग कमी झालेला आहे. लोकल लेट चालू आहेत. डॉप्लरने आलेल्या माहितीनुसार पुढच्या १० ते १२ तास पावसाचा तीव्र जोर असण्याची शक्यता आहे. मुंबईला रेड अलर्ट मिळालेला आहे. हीच बाब लक्षात घेता दुपारच्या सत्रांत शाळांना आपण सुट्टी दिलेली आहे. मंत्रालयातही दुपारी चार वाजेनंतर लोकांना निघून जाण्याची परवानगी आपण देत आहोत, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

## लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भावामुळे बैलपोळा साध्या पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन

**दि.१८, बुलडाणा :** जिल्ह्यामध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव असल्याने प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे दि. २२ ऑगस्ट रोजीचा बैलपोळा सण साधा व घरगुती पद्धतीनेच साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार जिल्ह्यात अधिसूचना जारी करण्यात आली असून रोगाचा प्रसार रोखण्यासाठी सर्व विभागांना प्रतिबंधात्मक खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा सण साजरा होणार आहे. या दिवशी बैल एकत्र करून सण साजरा केल्यास किंवा शर्यतींचे आयोजन झाल्यास लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर सर्व पशुपालकांनी साध्या पद्धतीने सण साजरा करण्यासाठी दक्षता घ्यावी, अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. तसेच हा अनुसूचित रोग असल्यामुळे प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शासकीय, निमशासकीय वा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून कार्यवाहीत दिरंगाई किंवा अडथळा आढळल्यास प्राण्यामधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ३१, ३२ व ३३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. याची सर्व संबंधित विभागांनी तसेच पशुपालकांनी गंभीर दखल घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## शिळ गावात नागरिकांच्या घरात पाणी शिरले... प्रशासनाचे शून्य नियोजन !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १८, शिळफाटा (ठाणे) :** सतत २ दिवस मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे शिळफाटा परिसराम ध्ये पावसाने धुमाकूळ घातला आहे. नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे.

रस्ते जलमय झाले आहेत. प्रशासनाने ज्या जुन्या ८ मोऱ्या होत्या त्याकडे लक्ष न दिल्यामुळे. त्यामुळे आता मोरया बंद झाल्या आहेत. त्या ठिकाणी माती टाकून भरणी केली आहे. अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे. घरामध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे नुकसान झाले आहे. दिवसभर नागरिक घरातील चिखल गाळ व पाणी काढून थकले आहेत. हाशा रामा पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये सुद्धा पावसाचे पाणी शिरले.

शिळगावामध्ये कचऱ्याचे ढिगारे जमा झाले आहेत. पालिका प्रशासन याकडे आतातरी लक्ष देणार का? की जीवितहानी झाल्यावरच आपले पाऊल उचलणार आहे हा प्रश्न आजच्या या परिस्थितीमुळे उपस्थित झाला आहे. अनेक वाहने रस्त्यामध्ये बंद पडली आहेत. या सर्व घटनांसाठी प्रशासन जबाबदार आहे. वेळीच जर दखल घेतली असती नैसर्गिक नाले यांची साफसफाई केली असती.

तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती. नागरिकांनी आणि शालेय मुख्याध्यापकांनी दिवा प्रभाग समितीमध्ये अर्ज देऊन सुद्धा अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. अशा सुस्त अधिकाऱ्यांवर ठाणे आयुक्त कारवाई करणार का? नागरिकांच्या झालेले नुकसानाची भरपाई देणार का? असा सवाल नागरिक यानिमित्ताने करत आहेत.




## शैक्षणिक लोकशाहीचा प्रयोग

केंद्राचे राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी २०२०) नाकारून आपले स्वतंत्र राज्य शिक्षण धोरण तमिळनाडूने आणले आहे. मोदी सरकारने २०२०मध्ये संसदेत चर्चा न करता, पारदर्शकता न ठेवता हे धोरण आणले. या धोरणात भारताच्या संघराज्याची चौकट आणि वैविध्य यांकडेही दुर्लक्ष केले गेले. एक देश, एक संस्कृती, एक धर्म, एक पक्ष, एक नेता, एक शिक्षण या सूत्रातूनच हे धोरण आणले गेले. केंद्राच्या शिक्षण धोरणावर अनेक संघटनांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी आक्षेप घेतले. तमिळनाडू, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदी राज्यांनीही आक्षेप घेतले आहेत; पण बहुमताचे बहुसंख्यवादात रूपांतर करून केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आपले धोरण पुढे रेटत आहे.

याला उत्तर म्हणून तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी 'एनईपी'ची अंमलबजावणी न करण्याची भूमिका घेतली. शिक्षण हा समवर्ती सूचीतला विषय असल्याने राज्य सरकार स्वतंत्र धोरण करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले होते. त्यानुसार एप्रिल २०२२मध्ये न्या. एम. मुरुगिसन यांच्या अध्यक्षतेखाली जणांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने जुलै २०२४मध्ये आपला अहवाल सादर केला होता. मधल्या काळात जी. एस. मणी यांनी तमिळनाडूत त्रिभाषा सूत्र राबविण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्रिभाषा सूत्राची सक्ती करता येत नसल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. यातून तामिळनाडूच्या स्वतंत्र शिक्षण धोरण करण्याचा मार्ग मोकळा झाला! या धोरणाची पुस्तिका नुकतीच प्रसिद्ध झाली आहे.

तमिळनाडूचे शिक्षण धोरण हे संविधानाच्या मूल्यांवर उभारलेले आहे. भारतीय मूल्यांपासून विकसित केलेली, सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देऊन, भारताला महासत्ता व ज्ञान समाज निर्माण करणारी, एकविसाव्या शतकाची आव्हाने स्वीकारणारी शिक्षण व्यवस्था निर्माण करणे, असे 'एनईपी'ने म्हटले आहे. भारतीय मूल्य, परंपरा वैदिक व अवैदिक अशा आहेत. वैदिक परंपरा पुरुषसत्ताक व चातुर्वर्ण्याचे समर्थन करते तर अवैदिक परंपरा समतेचा उद्घोष करते; परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतीय मूल्यांचा म्हणजे पुरुषसत्ताक, चातुर्वर्ण्यावर आधारित, गुरुकुल परंपरेचे उदात्तीकरण करणारी परंपरा असाच अर्थ धोरणात घेतला गेला आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या अभ्यासक्रम आराखड्यात मनुस्मृतीतील श्लोकाचा अंतर्भाव केला गेला होता!

तमिळनाडूच्या धोरणात मात्र 'समावेशक, न्याय, लवचिक व भविष्यासाठी तयार असलेली शिक्षण व्यवस्था तयार करण्याचा उल्लेख आहे. मुलांचा सर्वांगीण विकास, एकविसाव्या शतकात आवश्यक असलेली कौशल्ये देणे आणि तमिळनाडूचा समृद्ध सांस्कृतिक वारसा व मूल्य मुलांवर बिंबवून जबाबदार नागरिक तयार करणे, यांचाही उल्लेख त्यात आहे. अशा पद्धतीचा धोरणात बदल करण्याचा अधिकार संघराज्य कल्पनेत राज्यांना आहे. यालाच लोकशाही म्हणतात'. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भर वैयक्तिक नीतिमूल्याचा विकास करण्यावर आहे; संविधानिक मूल्यांचा त्यात उल्लेख आहे; पण त्यावर दिलेला भर दुय्यम आहे. या उलट तमिळनाडूच्या धोरणात संविधानिक नीतिमूल्य, सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक विचार पद्धती यावर जास्त भर आहे म्हणून संविधानिक साक्षरतेवर यात भर आहे. प्रत्येक शाळेचे दरवर्षी समतेबाबत (इक्विटी ऑडिट) पाहणी केले जाईल, असेही धोरण म्हणते! राज्यात शाळांमध्ये तमिळ व इंग्रजी या दोनच भाषा शिकवल्या जातील, असे या धोरणात म्हटले आहे.

सध्याच्या नव्या धोरणाप्रमाणे तिसरी, पाचवी आणि आठवी या इयत्तांसाठी परीक्षा घेतला जातात. तमिळनाडूचे धोरणात आठवीपर्यंत परीक्षा न घेण्याची भूमिका आहे. दहावी आणि बारावी या इयत्तांच्या परीक्षा फक्त शासकीय परीक्षा मंडळाकडून घेतल्या जातील, असेही हे धोरण म्हणते. पदवीसाठी प्रवेश परीक्षा घेण्यामुळे परीक्षांच्या तयारीचे क्लासेसचे एक प्रचंड मोठे आर्थिक रॅकेट तयार झाले आहे. त्यातून सामाजिक विषमता वाढत आहे हे वास्तव आहे. त्यामुळे तामिळनाडू सरकारचा 'वैद्यकीय प्रवेश परीक्षेला (नीट)' विरोध आहे. म्हणून तेथील शिक्षण धोरणाने बारावीच्या गुणांवर पदवीसाठी प्रवेश देण्याचा उल्लेख आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्यवसाय शिक्षण, डिजिटल लर्निंग यांवर, तमिळनाडूच्या धोरणात विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व इंग्रजी या विषयांवर भर आहे. तमिळनाडूत सध्या ७२ टक्के मुले उच्च शिक्षणात जातात. ही टक्केवारी शंभर पर्यंत नेणे हे या धोरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केंद्रीकरण आहे, तर तमिळनाडूच्या धोरणात विकेंद्रीकरणावर भर आहे. या धोरणात महत्त्वाचा फरक शैक्षणिक भूमिका, शैक्षणिक तत्त्वज्ञान यात आहे. तमिळनाडूचे धोरण आदर्श आहे, असे नाही. त्यात सुधारणेलाही वाव आहे; परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरणापेक्षा तमिळनाडूचे धोरण योग्य दिशेला जात आहे, असे म्हणता येईल. तमिळनाडूने रामास्वामी पेरियार यांचा वैचारिक वारसा अशा प्रकारे जिवंत ठेवला आहे.

# लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही

लग्न न करता एकत्र राहण्याचे ( लिव्ह इन रिलेशनशिप ) फॅड अलीकडे खूप वाढले आहे. विशेषतः शहरात राहणाऱ्या उच्चशिक्षित तरुण तरुणींमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे प्रमाण अधिक आहे. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये काही महिने राहून पहायचे जर एकमेकांचा स्वभाव पटला तर ठीक नाही तर ब्रेक अप करुन पुन्हा नवीन जोडीदार शोधून त्याच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचे असा हा प्रकार. ज्यांना विवाह संस्था मान्य नाही किंवा विवाह करायचा नाही असे तरुण तरुणी लिव्ह इन रिलेशनशिपला पसंती देत आहेत. केवळ अविवाहित तरुणच नाही तर घटस्फोटित व्यक्तीही लिव्ह इनमध्ये राहण्यास पसंती देत आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपकडे विवाह संस्थेला पर्याय म्हणून पाहणारा मोठा वर्ग समाजात निर्माण होत आहे. भारतीय कायद्याने लिव्ह इन रिलेशनशिपला पूर्ण मान्यता दिलेली नसली तरी लिव्ह इन रिलेशनशिप कायद्याने बेकायदेशीर किंवा गुन्हाही ठरवलेला नाही. भारतीय कायद्याने या नात्याला काही प्रमाणात संरक्षण आणि अधिकारही दिले आहेत पण हे करताना कायद्याने काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांसाठी ही मार्गदर्शक तत्वे पाळणे बंधनकारक आहे. असे असले तरी या मार्गदर्शक तत्वांचे पालन संबंधित जोडप्यांकडून होते का हा संशोधनाचा विषय आहे. मुळात लिव्ह इन रिलेशनशिपची व्याप्तीच इतकी अस्पष्ट आहे की आपल्या अधिकाराची आणि



कर्तव्याची लक्ष्मणरेषाच उभयंतांना समजत नाही त्यामुळे अशा संबंधात कालांतराने कटुता निर्माण होते. दोघांचे पटेनासे होते. विवाह संबंधांमध्ये एकमेकांविषयी जो आदर असतो तो तो लिव्ह इन मध्ये नसतो. दोघेही एकमेकांवर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे वाद वाढत जातात. त्यांच्यात मध्यस्थी करणाराही कोणी नसतो त्यामुळे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांचा न्यायालयात पोहचण्याचा प्रकार अलीकडे खूप वाढला आहे. एकदा वाद न्यायायलात पोहचला की न्यायालयात हेलपाटे घालावे लागतात त्यामुळे संबंधितांचे जीवनही उध्वस्त होते. नातेवाईक, समाजातही अवहेलना होते. काही वेळा तर वाद इतका विकोप्यास जातो की वादातून खुनही होतो.

दोन वर्षांपूर्वी दिल्लीतील श्रद्धा वालावकर या तरुण मुलीचा तिच्याच लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या जोडीदाराने निर्घृणपणे खून केला होता. त्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. दिल्लीतील या घटनेची नंतर पुण्यातही पुनरावृत्ती झाली होती. लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या या घटना पाहिल्या की लिव्ह इन मध्ये राहणे किती सुरक्षित आहे याचा विचार तरुणांनी करायला हवा. लिव्ह इन रिलेशनशिपला कायद्याने बेकायदेशीर ठरवले नसले तरी समाजाने अजूनही या नात्याला मान्यता दिलेली नाही. समाजाने अजूनही लिव्ह इन रिलेशनशिपला स्वीकारले नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांकडे समाज समाज कुत्सित नजरेनेच पाहतो. म्हणजे ज्या सुखासाठी लिव्ह इन रिलेशनशिपचा मार्ग स्वीकारला

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

ते सुख तर वाट्याला येतच नाही उलट दुःखच वाट्याला येते . खरंतर लिव्ह इन रिलेशनशिपला केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून पाहिले तर कोणीही लिव्ह इन रिलेशनशिपचे समर्थन करणार नाही. स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक असतात आणि त्या पूरकतेला बळ देण्यासाठीच अनादी काळापासून विवाह संस्था अस्तित्वात आली आहे. विवाह हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. विवाह संस्कृतीत काही त्रुटी असतीलही, विवाह झालेल्या जोडप्यांमध्ये पटत नाही, त्यांच्यात वाद होत नाही असे कोणी म्हणणार नाही. नवरा बायकोमध्येही वाद होतो. काहींचा वाद न्यायालयातही जातो. काहींचा घटस्फोटही होतो म्हणून विवाहच नको, लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय आहे असे कोणी समजत असेल तर ते चुकीचे आहे. लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दोन भिन्न लिंगी व्यक्ती एकत्र राहतात पण त्यांना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान नसते. या उलट विवाह झालेल्या व्यक्तींना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान असते केवळ जबाबदारीच नाही तर प्रेम, त्याग आणि तडजोडी बरोबरच विवाहात समर्पण भावनाही असते. मात्र पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधाणुकीकरण, भौतिकवादी दृष्टिकोन, इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करून दाखवण्याची प्रवृत्ती यामुळे शहरात विशेषतः मेट्रो शहरात विवाह संस्थेवरच प्रहार केला जात आहे. आजची उच्चशिक्षित तरुण पिढी कोणत्याही जबाबदारी शिवाय बंधनमुक्त जीवन जगण्यास उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे त्यामुळेच ते लिव्ह इन कडे वळत आहेत पण ते ही अटी आणि शर्तीवर बेतलेले असल्याने ते संबंधीही फार काळ टिकत नाही त्यापेक्षा समानता, प्रेम, त्याग आणि जबाबदारीची जाणीव असलेला विवाह लिव्ह इन रिलेशनशिपपेक्षा हजारो पटींनी चांगला आहे हे लिव्ह इनकडे वळणाऱ्या तरुणांनी समजून घ्यायला हवे.

# वास्तुकलेचा उत्सव ! मिरा भाईंदर मध्ये तीन दिवसीय प्रदर्शन संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१८, भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील के.एल. तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मध्ये तीन दिवसीय प्रदर्शनी इंटर:ॲक्ट - स्टेप इनसाइड द मेकिंग ऑफ आर्किटेक्चर चे भव्य आयोजन करण्यात आले.

हे प्रदर्शन कॉलेज ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी उत्सव तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सचिव राहुल तिवारी यांच्या सहकार्याने पार पडले. या प्रदर्शनाची विशेषतः अशी होती की वास्तुकलेने तयार केलेल्या इमारतींच्या स्वरूपात न मांडता त्यांच्या डिझाईन सादर करण्यात आल्या होत्या.

विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले मॉडेल्स, नकाशे, रेखाचित्रे आणि संशोधन कार्य प्रदर्शित केले. विशेष म्हणजे प्रेक्षकांना डिझाईन प्रक्रियेच्या विविध टप्प्यांचा अनुभव घेता आला. ज्यामुळे त्यांना वास्तुकलेतील



आव्हानांची सखोल माहिती भेटली. प्रदर्शनात मीरा-भाईंदरची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक किल्ले, जुने बाजार, गावांची वसाहत आणि आधुनिक इमारती प्रमुख आकर्षण ठरल्या. त्यामुळे केवळ विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला मंच मिळाला नाही तर शहराची वास्तु आणि सांस्कृतिक ओळख देखील ठळकपणे समोर आली.

तीन दिवस चाललेल्या या आयोजनात मुंबई, ठाणे आणि आसपासच्या भागातील आर्किटेक्ट्स, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले. या प्रदर्शनीने केवळ विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला मंच दिला नाही, तर शहराला एक सांस्कृतिक उत्सवाचाही अनुभव दिला.

## विष्ठा..

असे घातक सिद्ध रे
कबुतरांची ती विष्ठा
कळेना पणास लावे
कुणासाठी ती निष्ठा

रोग पिडा सतावे ती
लहानग्या नि वरिष्ठा
माणूस असे धोक्या
कधी कळणार जेष्ठा

विज्ञान ओरडूनसांगे
ओळखवेळी अरिष्टा
कठोर निर्णय जरुरी
साध्य करता उद्दिष्टा

मानवतेचा बाऊ करी
जन सोसे हालअपेष्टा
स्वतांच करुनि चुका
दोष लावतो रे अदृष्टा

पर्यावरण अडचणीत
समजेना का नादिष्टा
फक्त एक प्राणी दिसे
जाणवेना का छंदिष्टा

अंगलट येई अचानक
कधी त्या माकड चेष्टा
वादांग माते कशास्तव
वास्तवाची करे कुचेष्टा

सिद्ध करी प्रयोगातूनि
सन्मानद्यायचे अन्वेष्टा
कबूतराना न्या अन्यत्र
भूतदयापुण्य रे संतुष्टा

- हेमंत मुसरीफ, पुणे
मो. ९७३०३०६९९६

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ओपन बुक परीक्षा म्हणजे काय?



ओपन बुक परीक्षा म्हणजे कॉपी करण्याचा मुक्त परवाना! असं शिक्षण व्यवस्थेबाहेरीलच नव्हे तर शिक्षण प्रक्रियेतील लोकांनाही वाटू शकतं. मात्र, प्रत्यक्षात तसं नाही. ओपन बुक परीक्षा घेण्याचा निर्णय सीबीएसई मंडळाने घेतला आहे. त्यांनी काढलेल्या सूचना पत्रानुसार इयत्ता नववीच्या भाषा, सामाजिक शास्त्र, गणित आणि विज्ञान या विषयांच्या परीक्षा पुढील वर्षी 'ओपन बुक' पद्धतीने घेण्यात येतील.

माझ्या मते हा निर्णय शिक्षण व्यवस्थेतील उंची गाठणारा आहे. कालबाह्य व्यवस्थेला चिकटून राहण्याची माणसाची सवय अनेक पिढ्यांसाठी मारक ठरते. कालानुरूप बदललो नाही, तर येणारा काळ आपल्याला माफ करत नाही.

फार पूर्वी माहिती मिळवणे आणि ती स्मरणात ठेवणे यावरच विद्वत्ता ठरली जायची. १४५० च्या आसपास जोहान्स गटेनबर्ग याने छापखान्याचा शोध लावला. गटेनबर्गच्या मुद्रणयंत्रामुळे पुस्तके मोठ्या प्रमाणात आणि स्वस्त दरात उपलब्ध होऊ लागली, ज्यामुळे शिक्षण आणि ज्ञानाचा प्रसार जलद गतीने झाला. एका पुस्तकाच्या अनेक प्रती मिळू लागल्या. त्यामुळे पूर्ण स्मरणात ठेवणे किंवा पाठांतर करणे याचे महत्त्व कमी झाले. पुस्तक संचयात ठेवून त्याचा संदर्भ घेणे आणि त्यावरून नवीन ज्ञानाची निर्मिती करणे महत्त्वाचे ठरले. तरीसुद्धा स्मरणाधारित शिक्षणाचे महत्त्व संपलेले नव्हते.

पण १८८० नंतर झालेल्या संगणक व माहिती तंत्रज्ञान क्रांतीनंतर क्षणात माहिती उपलब्ध होऊ लागली. ज्ञाननिर्मिती प्रक्रिया ही प्रत्येक काळात उपलब्ध माहिती व अनुभवांवर आधारित होती. यालाच 'ज्ञानरचनावाद' म्हटले गेले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये क्षमता-आधारित अध्ययन, अध्यापन व मूल्यमापनावर भर देण्यात आला आहे. अध्ययनात घोकंपट्टीपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला, शिकवण्यापेक्षा शिकण्याला महत्त्व दिलं जात आहे. फक्त माहितीवर भर न देता ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित केले आहे. स्वतःच्या गतीने, स्वतःच्या पद्धतीने, स्वतःच्या तंत्राने शिकण्याला आजच्या काळात विशेष महत्त्व आले आहे.

वर्गामध्ये केवळ परीक्षेतील गुणांसाठी न शिकता शिकण्याचे कौशल्य व आजन्म शिकण्याची वृत्ती वाढीस लागावी, यावर भर दिला जात आहे. यासाठी अनुभवातून, कृतीतून, खेळातून, चर्चा, संवाद, विश्लेषण आणि सर्जनशील विचार यांद्वारे अध्ययन होणे अपेक्षित आहे.

-किशोर जाधव
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

सर्जनशील विचाराला आजच्या एकविसाव्या शतकात फार मोठे महत्त्व आहे. सर्जनशील विचार म्हणजे नवनवीन कल्पना सुचणे होय. सभोवताली निरीक्षण करून योग्य मत मांडणे, प्रश्न विचारणे, उपाय सुचवणे आणि त्यातील सर्वोत्तम उपाय निवडणे हे सर्जनशील विचाराचे भाग आहेत. नवीन विचार सुचणे किंवा आधीच्या विचारातून काहीतरी वेगळं सुचणे या प्रक्रियेला गती देण्याचं काम शिक्षणाने व्हायला हवं. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात हे फार महत्त्वाचं आहे.

सर्जनशील विचार विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक सौंदर्यदृष्टी, आशावादी विचारसरणी आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजवतो. म्हणूनच एनईपी २०२० मध्ये मूल्यांकन स्मरणाधारित न ठेवता सातत्यपूर्ण आणि अकारिक क्षमता-आधारित ठेवण्यावर भर दिला आहे. चिकित्सक विचार, वैचारिक स्पष्टता व विश्लेषण क्षमता या उच्च बौद्धिक क्षमतांची चाचणी घेणे हाच या मूल्यांकनाचा उद्देश आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता ओपन बुक परीक्षा घेण्यात येणार आहे.

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, ओपन बुक परीक्षेत विद्यार्थी नोट्स, पाठ्यपुस्तके आणि परवानगी असल्यास गॅजेट्सचा वापर करू शकतात. पण हे वापरताना आपली सर्जनशीलता आणि कल्पकता वापरून दिलेल्या प्रश्नाचे उत्तर अधिक व्यापक (सिंथेसाइज) आणि सर्वांगीण (सिनर्जिक) असावे. या सर्व गोष्टी आत्मसात करण्यासाठी परिपक्वता लागते, जी शालेय वयात कठीण आहे. त्यामुळे ही परीक्षा जास्त गुण मिळवण्याचा शॉर्टकट नाही, हे लक्षात येईल.

महत्त्वाचे म्हणजे, ही पद्धत यशस्वी करण्यासाठी अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकनाचा दर्जा उंचीचा असणे अत्यावश्यक आहे. तो आहे का, याची तपासणी झाली पाहिजे. तसेच आपले शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक वातावरण या पद्धतीसाठी पोषक आहे का, हेही पाहिले पाहिजे.

मी जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या एका पुस्तकावर ओपन बुक परीक्षा घेतली होती, तेव्हा मी असा प्रश्न विचारला होता :

तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात भरती व्हायचे आहे. त्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नावे नोकरीचा अर्ज करा.

अशा प्रकारच्या प्रश्नांतूनच खरी ओपन बुक परीक्षा घेता येईल, ही अपेक्षा आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान: तालुक्यातील ५ पैकी ५ मंडळात अतिवृष्टी



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१८, पालम (परभणी) :** मागील चार दिवसांपासून होणाऱ्या अतिवृष्टी मुळे पालम तालुक्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सर्व नद्याना मोठया प्रमाणात पूर आल्याने पिके पाण्याखाली गेली आहेत. दिनांक १८ ऑगस्ट च्या शासकीय अहवालानुसार पालम तालुक्यातील पालम, चाटोरी, बनवस व पेठशिवणी या चार मंडळांमध्ये अतिवृष्टी झालेली आहे. नद्या,नाले त्यांचे पात्र सोडून वाहत असून नदी शेजारील शेताला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिरपूर-सायाळा गावांमधील गळाटी नदीला महापूर आल्याने पाणी पुलावरून वाहत आहे तेथील दळणवळण ठप्प आहे. तसेच सरफराजपूर- धुप्पा या गावातील नदीपात्र ओलांडून शेजारील शेतामध्ये तिचे पाणी घुसले आहे. काही ठिकाणी रस्त्यांनाही नद्याचे स्वरूप आलेले आहे. कित्येक गावात पिके पाण्याखाली गेली असुन हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेमुळे हिरावून घेतला जात आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद, मुग, कापूस इत्यादी पिके जोमात वाढत असतानाच या ४ दिवसापासून पडणाऱ्या पावसाने शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. परिणामी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तालुका प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## विसापूर येथील गुरूदेव भक्त मारोती गांवडे कालवश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौकात श्रद्धांजली सभा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, विसापूर (चंद्रपूर) :** विसापूर येथील अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन सदस्य व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांच्या विचारांचे प्रचारक तथा धनगर समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ता मारोती गांवडे उर्फ गांवडे बाबू (८९ वर्ष) यांचे वृद्धापकाळाने शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट ला सायंकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुन, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. मारोती गांवडे जिल्हा परिषद मध्ये कार्यरत होते. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी अखेरपर्यंत गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याला वाहून घेतले. वयोवृद्ध झाल्यावर देखील त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार केला. त्यांचे शनिवारी निधन झाले. आज सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता त्यांची अंत्ययात्रा निघाली. दरम्यान येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रार्थना मंदिराच्या प्रांगणात त्यांचे पार्थिव अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आले. यावेळी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, विविध सामाजिक संस्था, गुरुदेव भक्तांनी व अनेकांनी अंत्यदर्शन घेत पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. गुरुदेव सेवा मंडळाचे बंडोपंत बोढेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली सभा प्रार्थना सभागृह प्रांगणात घेण्यात आली. यावेळी गुरुदेव भक्त व गणमान्य नागरिकांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून आदरांजली अर्पण केली. त्यानंतर एका सजविण्यात आलेल्या वाहनातून भजन मंडळींच्या सहकार्याने अंत्ययात्रा निघाली. गुरुदेव भक्त मारोती गांवडे उर्फ गांवडे बाबू यांच्या अंत्यविधी विसापूर येथील स्मशानभूमीत झाला. यावेळी पंचक्रोशीतील गणमान्य नागरिकांची व गुरुदेव भक्तांची उपस्थिती होती.

## शेकडो एकरात पाणी; पिकांची नासाडी

### कर्जमाफी करण्याची आग्रही मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात जून, जुलै महिन्यात समाधान करणारा पाऊस झाला. यामुळे शेत शिवार हिरवेगार झाले. शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, तूर, भात व अन्य खरीप पिक बहरले. यावर्षी निसर्ग सात देणार म्हणून शेतकऱ्यांना समाधान वाटत होते. मात्र, हे समाधान अल्पजीवी ठरले. वर्धा नदी कोपली. तिच्या पुरामुळे शेकडो एकरात पाणी आले. पिकांची नासाडी झाली. यामुळे शेतकऱ्यांवर आक्रोश करण्याची वेळ आली. आता सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

बल्लारपूर तालुक्यात सर्वाधिक शेतशिवार वर्धा नदीच्या आसपास आहे. कोरडवाहू कृषी क्षेत्र निसर्गाच्या जलचक्रावर अवलंबून आहे. अशातच वर्धा नदीच्या पुराने शेतकऱ्यांची दैना अवस्था केली आहे. नदी सखल भागात शेकडो एकरात पुराचे पाणी आले आहे. यामुळे पिकांची नासाडी झाली आहे. याचा फटका चारवट, हडस्ती, नांदगाव, विसापूर, बल्लारपूर, बामणी, दहेली आदी भागातील शेतकऱ्यांना अधिक बसला आहे.

वर्धा नदीच्या पुराने गावालगतची शेती गिळकृंत केली. सुपीक जमीन खरडून गेली. आम्हाला शेती परवडत नाही. पण उपाय नाही. शेतकऱ्यांची दैना आहे. शेत जमीन उरली नाही. भाड्याने शेती करावे लागते. पिक हाताशी येत नाही. परिणामी कर्ज काढून शेती करावी लागते.

**– मारोती वाढई, पिडीत शेतकरी हडस्ती**

पुराने आमच्या उपजिविकेचा प्रश्न गंभीर केला आहे. मेहनतीच्या बळावर शेत हिरवेगार झाले. पण पुराने डोळ्यादेखत सगळे वाहून गेले. आमचा भविष्याचा आधार गेला. कर्जबाजारी शेतकऱ्यांनी जगावे कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. आतातरी सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी.

**– प्रशांत अटकारे, हतबल शेतकरी**

# अण्णा हजारेंना 'पुणेरी टोमणे' झोंबले

## म्हणाले, मी १० कायदे आणले, नव्वदीत देखील करत राहायचं का?




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मत चोरीच्या मुद्यावर देशातील राजकारण तापले असताना, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रतिक्रिया समोर आली नाही. यावरून त्यांना झोंबणारे 'पुणेरी टोमणे' मारणारा बॅनर पुण्यातील पाषाण रोडवर परिसरात झळकवण्यात आला. त्या बॅनरवरील पुणेरी टोमणे अण्णा हजारे यांना चांगलेच झोंबले असून, त्यावर त्यांनी प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली आहे.

अण्णा हजारे म्हणाले, मी १० कायदे आणले. मात्र ९० वर्षानंतर देखील मी करत राहावं आणि तुम्ही झोपून राहावं, ही अपेक्षा चुकीची आहे. अण्णांनी जे केलं ते आपण करावं, असं तरुण युवकांना वाटलं पाहिजे, देशाचे नागरिक आहेत तर, आपलं काही कर्तव्य आहे की नाही?

काल स्वतंत्र दिवस साजरा केला. नुसता तिरंगा हातात घेऊन होणार नाही, बोट दाखवून काहीही होणार नाही. मी मोठ्या आशेने तरुणाकडे पाहतोय, युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे, ही जागी झाली तर उद्याच भविष्य दूर नाही, असे अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

मात्र,एवढे वर्ष लढून कायदे करून जेव्हा कानावर येतं अण्णांनी जाग झालं पाहिजे, तेव्हा वाईट वाटत', असे म्हणत अण्णा हजारेंनी नाराजी व्यक्त केली. अण्णा हजारेंनी २०१२ मध्ये दिल्लीत मोठं आंदोलन उभारलं होतं. दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर झालेल्या या आंदोलनात देशभरातून लोक सहभागी झाले. याच आंदोलनाचा फटका २०१४ मध्ये काँग्रेसला बसला. काँग्रेसची सत्ता जाण्यामध्ये कुठेतरी या आंदोलनाचा देखील वाटा होता. भाजप सरकारच्या काळामध्ये अण्णा हजारेंनी एकही मोठं आंदोलन केलेलं नाही, तस पाहायला मिळत देखील नाही. त्यामुळे सध्या काँग्रेसकडून देशभरामध्ये मत चोरी बाबत आंदोलन उभारण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर हे बॅनर सध्या पुण्यात झळकत असल्याचे पहायला मिळत आहे.

# शेतकऱ्यांच्या राज्यव्यापी प्रश्नांवर ढवण यांचे दि.२० पासून उपोषण




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१८, सुपा (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांचे कर्जमाफी, कांदा भाव वाढ व निर्यात धोरण आणि इतर प्रश्नांसंदर्भात आपली माती, आपली माणसं या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष रुपेश ढवण हे बुधवार, दिनांक २० ऑगस्ट पासून शेतकऱ्यां समवेत शेतकऱ्यांसाठीच्या आर पार लढाई करिता आमरण उपोषणाला बसणार आहेत. युवा शेतकरी नेते रुपेश ढवण यांनी नुकतेच ४ दिवस यशस्वी अन्न त्याग आंदोलन केले. त्या आंदोलना ला राज्यभरातून शेतकरी, वारकऱ्यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याने शेतकऱ्यांच्या या आंदोलनाची व्याप्ती राज्यभरात झाल्याने राज्य विधानसभेच्या निवडणुकीत म हायुतीतील घटक पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यात शेतकरी कर्ज माफी जाहीर केली, निवडणूक होवून वर्ष पुर्ण होत आले, आश्वासन पाळले नाही, राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला कांदा भाव वाढ, त्यासाठी बांगला देश व इतर देशात कांदा निर्यात धोरण राबवण्यासाठी निर्यात खुली करावी, इतर शेती मालाला हमी भाव मिळावा म्हणून रुपेश ढवण यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न तडीस लावल्याशिवाय शांत बसणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ पासून शेतकरी पुत्र रूपेश ढवण हे आमरण उपोषणाला बसणार असून त्यांच्या समवेत युवा कार्यकर्ते महेंद्र पांढरकर, देवराम लामखडे, पोपट तनपुरे, कचरू वरखडे, बाबाजी पठारे, दादा वराळ, संतोष लामखडे, संजय तनपुरे, अशोक शेटे, राजेंद्र वाळुंज, सोनी पवार, नंदाबाई वरखडे, साखराबाई वरखडे, हिराबाई वराळ, बबिता काळे, शोभा ढवळे व इतर शेतकरी साखळी उपोषण करणार आहेत. यावेळी शेतकरी पुत्र रूपेश ढवण यांचे आमरण उपोषणाला बसणार असून बुधवार, दि.२० पासून ते शुक्रवार, दि.२९ पर्यंत दररोज सायंकाळी ६ ते ७.१५ वाजेपर्यंत हभप अशोक कानडे महाराज, हभप तुषार गुंड, हभप धनंजय गोरडे, हभप बाळासाहेब पठारे, हभप सर्जे राव मस्कर, हभप बाबा खामकर, हभप शीराम घुले, हभप पोपट तनपुरे, हभप शीहरी पवार महाराज यांचे हरी प्रवचन होणार असून वेळेनुसार विविध गावातील भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तदनंतर रात्री ७.३० ते ८.३० वाजेपर्यंत थोर अन्नदात्यांच्या लोकसहभागातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# बोरी वेळेवाडी ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (खंडाळा) :** एप्रिल मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यामध्ये सर्व शेतकरी बांधवांचे पिकाचे नुकसान झालेले आहे तरी महाराष्ट्र शासनाने सर्व शेतकरी बांधवांसाठी नुकसान भरपाई जाहीर केली. व त्या अनुषंगाने सर्व तलाठी व कृषी सहाय्यक यांना शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले. परंतु बोरी आणि वेळेवाडी येथील शेतकऱ्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता परस्पर सत्ता बळाचा बेकायदेशीर उपयोग करून निवडक अशा शासकीय अटीमध्ये न बसणाऱ्या ७ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली.

अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या अनेक शेतकऱ्यांना या लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्या कामी प्रशासकीय अधिकारी कृषी सहाय्यक व कामगार तलाठी यांनी गावचे कोतवाल व गावातील प्रमुख राजकीय मतांची गोळा बेरीज करणाऱ्या गाव पुढाऱ्यांनी आपल्या स्वमताने हा अवकाळी पंचनामा न करता घरात बसून मतांच्या राजकारणा पोटी अनाधिकृत बेकायदेशीर अशी आपल्याला फायद्याची होईल असे राजकारण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेच्या गैरवापर करून अनेक गरजू व लाभार्थ्यांच्या कायदेशीर अटीत बसणाऱ्या शेतकऱ्यांना वंचित ठेवण्याचे प्रशासकीय अधिकारी व गाव पुढारी यांच्या संगन मताने कायदेशीर रित्या नियमावलीत न बसणाऱ्या केवळ फक्त बोरी वेळेवाडी मध्ये ७ शेतकऱ्यांची या यादीमध्ये राजकीय स्वार्थापोटी निवड करण्यात आलेली असून सदर विषयांमध्ये दोषी असणाऱ्या गाव काम गार तलाठी बोरी वेळेवाडी कोतवाल व कृषी सहाय्यक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी तरी आम्हाला शासकीय वरिष्ठ अधिकारी यांनी न्याय मिळवून द्यावा ही बोरी वेळेवाडी येथील शेतकऱ्यांची मागणी आहे तरी दोषींवर कारवाई न झाल्यास बोरी वेळेवाडी येथील शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदार कार्यालय खंडाळा येथे १ सप्टेंबर २०२५ पासून सामूहिक आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला. हे निवेदन देण्यासाठी बोरी गावचे उपसरपंच सतीश वेळे, भगवानदादा शेडगे,वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका उपाध्यक्ष स्वप्निल जावळे, गणेश केसकर, बोरी विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन गणेश धायगुडे, युवा नेते स्वप्निल जावळे, भगवान वेळे भगवान पिसाळ, आदिनाथ देवकाते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पूरग्रस्त भागांना माधवराव पाटील यांची भेट; परिस्थितीचा आढावा घेत पूरग्रस्तांना दिला धीर



**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१७, हिमायतनगर (नांदेड) :** हिमायतनगर येथे झालेल्या अतिवृष्टीम ध्ये मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळं हिमायतनगर सह तालुक्यातील अनेक गावांचे मोठं नुकसान झालं आहे. याच पार्श्वभूमीवर माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी दिनांक १७ ऑगस्ट रोजी हिमायतनगर तालुक्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत आणि परिस्थितीचा आढावा घेत पुराचा फटका बसलेल्या नागरिकांना धीर दिला. अनेक ठिकाणी पाण्यामुळं रस्ते खचले असताना देखील स्वतः त्या ठिकाणी जाऊन परिस्थितीची पाहणी केली. मुसळधार झालेल्या ढगफुटी सुदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांचे अर्थात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते याबाबत सदरील पूरग्रस्तांची आणि शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. तसेच त्यांनी व मदत व पुनर्वसन मंत्री यांना भ्रमणध्वनीवरून परिस्थितीचा मागोवा घेऊन जिल्हाधिकारी यांना आदेशित करून तात्काळ पंचनामा करण्याच्या सूचना द्यावेत अशी ही विनंती केली त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी दोन दिवसात पूरग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामा केला जाईल असे आश्वासन दिले ,दोन दिवसापासून झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते पाऊस थांबल्यामुळे पूर कोसळण्यास मदत झाली आहे. मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे.

## निवघा येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाची प्रशासनाने घेतली दखल

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१८, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील निवघा येथे प्रमुख मागण्यांसाठी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पवार, गंगाधर पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. संबंधित प्रशासनाने याची दखल घेऊन प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले असून लोकप्रतिनिधींच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेण्यात आले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांना सिंगल फेजिंग वीज पुरवठा देण्यात यावा. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे वन्यप्राणी धुम ाकूळ घालत असल्याने यांचा बंदोबस्त करण्यात यावा. पांदण रस्ते खुले करण्यात यावे, ग्रामीण रस्त्यासाठी निधी देण्यात यावा प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषण करण्यात आले होते. महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता पंकज देशमुख संबंधित कंत्राटदार अभियंता यांनी उपोषण स्थळांस भेट देऊन शेतकऱ्यांना सिंगल फेजिंग विद्युत पुरवठा दोन महिन्यांत मिळणार असल्याचे लेखी आश्वासन दिले आहे. वनविभागाचे वनपाल कवळे यांनी उपोषण स्थळास भेट देऊन ग्रामस्थांच्या वनप्राण्या संबंधित समस्या यावर उपाय करण्याचे आश्वासन देऊन बिबट्याच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांनी नुकसान केलेल्या पिकांची भरपाई चे धनादेश यावेळी वितरित करण्यात आले. ग्रामीण रस्त्यासाठी खासदार प्रा.रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा प्रशासनाकडे केलेल्या शिफारशीचे पत्र स्वाभिम ानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत राजेगोरे यांच्या हस्ते पत्र देण्यात आले आहे. प्रमुख मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा करून समस्या सोडविण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आमरण उपोषण मागे घेण्यात आले आहे. भोकर विधानसभा काँग्रेसचे युवा नेते पप्पू पाटील कोंढेकर, जिल्हाध्यक्ष युवराज राजेगोरे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, प्रा.संदीप देशमुख, राजेश पवार निवघेकर, विश्वनाथ पवार, भगवान पवार, योगेश पवार यांच्या हस्ते लिंबू पाणी देऊन उपोषण सोडविण्यात आले आहे.

# मंथन लसणे याने फायटिंग मध्ये गोल्ड मेडल, त्यूमेन्स (कराटे) मध्ये सिल्वर पदक पटकावले

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, भिवंडी (ठाणे) :** मलेशिया येथे चइथ आंतरराष्ट्रीय त्वायकॉन्डो चॅम्पियनशिप स्पर्धा १५ ऑगस्ट सुरू झाली. १७ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये १५ देश सहभागी झाले होते या स्पर्धेमध्ये भिवंडी मधील कवाड गावातील मंथन अजय लसणे वय १६ शिक्षण दहावी त्याने या स्पर्धेमध्ये फायटिंग मध्ये गोल्ड पदक पटकावले आहे.



तसेच त्यूमेंन्स (कराटेमध्ये) सिल्वर पदक पटकावले आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व नागरिकांकडून मंथन लसणे वर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.तसेच त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहे. मंथन लसणे यांना लहानपणापासूनच या खेळाचा छंद लागला आहे. इयत्ता पाचवी पासून त्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घ्यायला सुरुवात केली. मागील पाच वर्षामध्ये विविध देशांमध्ये स्पर्धेमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. सिंगापूर येथे त्याने गोल्ड मेडन पटकावले होते. थायलंड येथे सुद्धा गोल्डमेडन पटकावले होते.

मलेशिया येथे ब्रांझ पदक सुद्धा त्यांनी मिळवले होते. खरंच मंथन लसणे तुझा आम्हाला सर्वांना अभिमान अभिमान आहे. मंथन तुम्ही आपल्या महाराष्ट्राचं नाव कानाकोपऱ्यात पोचवला आहेस. आई-वडिलांचे नाव काढलंच पट्ट्या, आपल्या गावाचं आपल्या भिवंडीचा अखेर देशभर नाव पोचवले. असेच गोल्ड मेडल मिळवत जा आपल्या देशाचं नाव उज्वल करत जा अशा शुभेच्छा सुद्धा त्याच्या आई-वडिलांनी दिले आहेत. आई-वडिलांना सुद्धा खूप आनंद झाला आहे.

# थोडक्यात

## कृष्णा पवारला पॅरालिंपिक मध्ये सुर्वण पदक



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१८, महाबळेश्वर (सातारा) :** इंडियन ओपन पॅरा ॲथलॅटीकस चॅम्पियनशिप २०२५ आयोजीत स्पर्धे मध्ये कुमारी कृष्णा प्रमोद पवार हीने गोळाफेक व थाळीफेक या खेळ प्रकारात अंध वर्गामध्ये सुर्वणपदके मिळवली आहेत. तीचे वय वर्ष १५ असून ती गिरिस्थान प्रशालेची विद्यार्थींनी आहे. अपल्या अंधत्वावर मात करीत मेहनतीच्या बळावर तीने मिळवलेली सुर्वण पदके ही महाबळेश्वरसाठी अभिमानाची बाब आहे. या स्पर्धेकरिता प्रमुख पाहुणे मुरलीधर पेटकर भारताचे पहिले पॅरालापिक सुर्वण पदक विजेते तसेच सचिन खिल्लारी पॅरालापिक रजत पदक विजेते यांच्या हस्ते कृष्णाला सुर्वण पदक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेसाठी प्रशिक्षक डॉ अक्रम मुजावर (डि पी भोसले कॉलेज कोरेगाव) तसेच फिजिकल ट्रेनर शोएब शेख फ्रेंडस् फिटनेस कल्ब महाबळेश्वर राजेंद्र पवार पॅरास्पोर्टस असोशिएन सातारा, विक्रम शेंडगे व नवनाथ बिडगर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# मौजे चुनाकोळवण माजी विद्यार्थी संघाचे २१ व्या वर्षात पदार्पण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, दादर (मुंबई) :** सामाजिक पटलावर आदर्श तितकीच दिशादर्शक ठरणारी मौजे चुनाकोळवण माजी विद्यार्थी संघ ग्रामीण/ मुंबई (रजि.)तालुका राजापूर, संस्थेचा २० वा वर्धापनदिन सोहळा शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी ताराबाई मोडक, शिशुविहार माध्यमिक विद्या मंदिर, दादर -पूर्व, मुंबई-१४ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. उपरोक्त संस्थेचे संस्थापक/ अध्यक्ष रविंद्र मटकर यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक मनोगतातून संस्थेचे ध्येय, धोरण आणि संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

सामाजिक हित जोपासणाऱ्या ह्या संस्थेच्या २० वा वर्धापनदिन आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत उपरोक्त संस्थेच्या वतीने सामाजिक, कला, शैक्षणिक, सहकार, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले असून सामाजिक, कला क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पुरुषांच्या बरोबरीने महिलांचेही योगदान अतुलनीय आहे. याच प्रति संस्थेच्या वतीने पती सह पत्नीक आदर्श जोडी संजय गोंधळी व संध्या संजय गोंधळी (हातीव-संगमेश्वर), निवेदक/पत्रकार दिपक कारकर व सौ शिल्पा दिपक कारकर(मूर्तवडे -चिपळूण), नमन /नाट्य लेखक दिग्दर्शक सागर डावल व स्वप्ना सागर डावल (शीर-गुहागर)यांना आदर्श जोडी पुरस्कार-२०२५ ने सन्मानित करण्यात आले.त्याचबरोबर सामजिक कार्यकर्ता/



पत्रकार- उदय दणदणे (निवोशी-गुहागर)यांना आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्याचबरोबर राधा कृष्ण मंडळ, तळेकरवाडी(कळसवळी)-आदर्श गाव मंडळ तर तुळाजी बाबू मटकर (चुनाकोळण) यांना आदर्श गाव प्रमुख म्हणून सन्मानित करण्यात आले.

पुरस्कारर्थींना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदर सोहळ्याला रविंद्र मटकर, सुरेश मटकर, संजय गोंधळी, संध्या गोंधळी, अशोक सावंत, पिंकेश बापर्डेकर, संतोष चौगुले, दिपक कारकर, उदय दणदणे, सागर डावल,कल्पनाताई पाटणकर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताराम मटकर यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख पदाधिकारी, सदस्य आजी-माजी विद्यार्थी, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एम.सी.ई.डी. मार्फत वसईमध्ये फॉस्टॅक ट्रेनिंगचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पालघर :** उद्योग संचालनालय-महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.) पालघर यांच्या वतीने फूड सेक्टरशी निगडीत अन्न सुरक्षाबाबत FoSTaC या महत्वपूर्ण एक दिवसीय ट्रेनिंगचे वसई येथे दि.२२ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी नियोजन केले आहे.

सदरील ट्रेनिंगमध्ये, अन्न प्रकिया उद्योगातील विविध कायदेबाबत सखोल माहिती, अन्नाचे पॅकेजिंग आणि वितरण कसे करावे, अन्न संचालन आणि नियोजन, वर्तणूक आणि स्वच्छता,अन्न सुरक्षा आणि अन्न सुरक्षाबाबतचे धोके, अन्न प्रकिया उद्योगासाठी विविध कर्ज आणि अनुदान योजना इत्यादी बाबत फॉस्टॅक मान्यताप्राप्त खास ट्रेनर मार्फत सविस्तर मार्गदर्शन आणि माहिती देण्यात येणार आहे.

सदरील प्रशिक्षण दि.२२ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११.३० ते ४.३० या वेळेत बाल भवन, साठ फूट रोड, अष्टविनायक लेन, वसई वेस्ट जि. पालघर या ठिकाणी होणार आहे.

अन्न प्रकिया उद्योग करणारे किंवा इच्छुक असणाऱ्या सर्व उद्योजक-भावी उद्योजकांनी या ट्रेनिंगमध्ये नाव नोंदणीसाठी दिनांक २१ ऑगस्ट २०२५ पर्यंत श्री.डी सी. थोरात- प्रकल्प अधिकारी, एम. सी. ई डी. पालघर मो.९१६८६६७१६३ किंवा सौ.स्वाती भोईर-प्रशिक्षण समन्वयक एम. सी . इ.डी.पालघर मो.९२८४८०८७६१ यांना संपर्क करण्याचे आवाहन विभागीय अधिकारी एम.सी. ई.डी. मुंबई श्री.डी. यू. थावरे यांनी केले आहे.

# नेवासा येथे फर्निचरच्या दुकानाला भीषण आग ! एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** नेवासा फाटा येथे रविवारी मध्यरात्री घडलेल्या एका भीषण आगीच्या घटनेने परिसर हादरला आहे. कालिका फर्निचर या दुकानाला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील पाच जणांचा गुदमरून मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने स्थानिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

नेवासा फाटा कॉलेज परिसरातील कालिका फर्निचर दुकानाला मध्यरात्री अंदाजे दोनच्या सुमारास अचानक आग लागली. दुकानाच्या मागील बाजूस राहणाऱ्या मयूर रासने यांच्या कुटुंबाला या आगीने वेढले. आगीचा भडका इतका तीव्र होता की, कुटुंबीयांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.या दुर्घटनेत मयूर अरुण रासने (वय ३६), त्यांची पत्नी पायल (वय ३०), त्यांचे दोन मुलं अंश (वय ११),व चैतन्य (वय ६) आणि आजी सिंधुताई चंद्रकांत रासने (वय ८५) यांचा गुदमरून मृत्यू झाला. मयूर यांचे वडील अरुण रासने आणि त्यांच्या पत्नी मालेगाव येथे नातेवाइकांकडे गेले असल्याने बचावले.आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा संशय आहे. दुकानातील लाकडी फर्निचर आणि ज्वलनशील पदार्थांमुळे आगीने रौद्ररूप धारण केले.

आगीची माहिती मिळताच नेवासा पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पाचही जणांचा भाजून व गुदमरून मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज नेवासा पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

## निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाची चौकशी करा : रविश रासकर




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील सुपा जुनी एमआयडीसी व सुपा फेज २ एमआयडीसी मधील रस्त्यांचे निकृष्ट दर्जाच्या कामे केलेल्या ठेकेदारावर गुन्हे दाखल करावेत आणि ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई व्हावी, या मागणीसाठी कामगार नेते सामाजिक कार्यकर्ते रविश रासकर यांनी सोमवारपासून (दि.१८) एमआयडीसी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनास विविध संघटना आणि ग्रामस्थांचा पाठिंबा मिळत असून रविश रासकर, प्रविण दळवी, तेजस गायकवाड,यश मिसाळ, दादा शेळके, संकेत गुंजाळ व त्यांचे सहकारी उपोषणाला बसले आहेत.

यावेळी अधिकारी उपोषण कर्त्यांसोबत चर्चा करण्यासाठी आले होते. परंतु एमआयडीसी मधील रस्त्यांची कम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून दोषी अधिकाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण सुरू राहणार असल्याचे ठामपणे उपोषण कर्त्यांनी ठणकावून सांगितले.

सुपा जुनी एमआयडीसी व सुपा फेज २ एमआयडीसी अंतर्गत निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांचे काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे व त्या ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते रविश रासकर यांनी निवेदनाद्वारे काही दिवसांपूर्वी मागणी केली होती. परंतु रस्त्यांच् कामाची व ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली नसल्याने रासकर यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

सुपा जुनी एमआयडीसीमध्ये केलेली रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे व शासनाने दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करत करत असल्याचे दिसून येते आहे. या कामामध्ये अनेक त्रुटी आहेत. कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आलेले नाही. तरी संबंधित ठेकेदार व त्या ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी रविश रासकर यांनी केली आहे.

# मांडओहळ धरणाच्या सांडव्याची उंची वाढवावी ; खा.लंके यांची शरद पवारांकडे मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील दुष्काळी पट्ट्यातील जनतेसाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या मांडओहळ मध्यम प्रकल्प धरणाच्या सांडव्याची १ मीटर उंची वाढवावी अशी मागणी अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांनी ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केलीय.

दिल्ली येथील खासदार शरद पवार यांच्या निवासस्थानी खासदार निलेश लंके यांनी भेट घेतली. यावेळी उद्योजक बजरंग गागरे, सामाजिक कार्यकर्ते राजू रोकडे, विष्णु शिंदे, कैलास आग्रे उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील पारनेर तालुक्याच्या उत्तर



भागातील दुष्काळी पट्ट्यातील जनतेसाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या मांडओहळ मध्यम प्रकल्पाची विद्यमान साठवण क्षमता ३९९ दशलक्ष घनफूट इतकी आहे. तर उपयुक्त साठा ३१० दशलक्ष घनफूट आहे. सदर धरणाची जलसाठवण क्षमता चांगल्या प्रकारे शिल्लक असून, दरवर्षी परतीच्या पावसामुळे धरण अल्पावधीतच ओव्हरफ्लो होते. सदर धरणाच्या सांडव्याची केवळ १ मीटर उंची वाढविल्यास, गोदावरी खोऱ्याच्या जलहिशोबावर (वॉटर अकाउंटिंग) कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. याउलट, धरणामधील साठवण क्षमता वाढल्यामुळे पारनेर तालुक्यातील जवळपास अर्धा भाग सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या टंचाईपासून मुक्त होईल. सदर धरण गोदावरी खोऱ्या अंतर्गत येत असल्याने सांडव्याची उंची वाढवणे अडचणीचे होत आहे. तरी, आपल्याकडून सदर विषयाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित पातळीवर पाठपुरावा करून आवश्यक त्या प्रशासकीय प्रक्रिया मार्गी लावून धरणाच्या सांडव्याची १ मीटर उंची वाढवण्याबाबत सर्वतोपरी सहकार्य करावे असे निवेदनात म्हटले आहे.

## वाई ग्रामीण रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१८, वाई (सातारा) :** वाई तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या बाबतीत हे रुग्णालय आघाडीवर असून वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील व ग्रामीण भागातील गरीब गरजू आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आशेचा किरण ठरत आहे. येथील नेत्ररोग तज्ञ डॉक्टर विठ्ठल भोईटे हे सेवानिवृत्त होऊनही रुग्णांची सेवा अखंडपणे चालूच ठेवली आहे. मोतीबिंदू रुग्णांना नव संजीवनी देण्यासाठी कार्यरत आहेत. वाई ग्रामीण रुग्णाच्या माध्यमातून २१ महिला व पुरुष रुग्णावर यशस्वी मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. सांगली येथील नंदादीप रुग्णालयात फेको टेक्नॉलॉजी सारख्या आधुनिक प्रणालीद्वारे ही शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखी खाली मोफत करण्यात आली. यात रुग्णांच्या संपूर्ण तपासण्या डोळ्याची चाचणी मधुमेह रक्तदाब तपासण्या पूर्ण मोफत केल्या जातात. शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना वाईतून सांगली आणि वरद वाई येथे नेण्या जाण्याची स्वतंत्र वाहनाची मोफत सोय केली जाते. रुग्णांना किंवा नातेवाईकांना कोणताही प्रवास किंवा जेवणाचा खर्च करावा लागत नाही. वाई परिसरात मोतीबिंदूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून त्यामध्ये निराधार रुग्णांची संख्या लक्षणीय आहे. त्यांच्यासाठी डॉक्टर विठ्ठल भोईटे आणि ग्रामीण रुग्णालय देवदूत ठरत आहेत.

# पनवेल महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या आकांक्षित स्वच्छता गृहाचे उद्घाटन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, पनवेल :** महानगरपालिकेच्या मलनिस्सारण विभागातर्फे पनवेल शहरातील गार्डन हॉटेल येथील बस थांब्या शेजारी आकांक्षित स्वच्छता गृह उभारण्यात आले आहे. या आकांक्षित स्वच्छतागृहाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर तसेच आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक नितीन पाटील, गणेश कडू, चारुशीला घरत, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, रुचिता लोंढे, अजय



बहिरा, अनिल भगत, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते आदि मान्यवर उपस्थित होते.

मा.आमदार महोदयांनी केलेल्या विशेष मागणीनुसार या स्वच्छता गृहाची उभारणी करण्यात आली आहे. येत्या काळात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रात दहा ठिकाणी अशा प्रकारचे आकांक्षित स्वच्छता गृहे बांधण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना उत्तम सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. गार्डन हॉटेल परिसरात प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळे याठिकाणी स्वच्छता गृहाचे महत्व लक्षात घेऊन महापालिकेच्यावतीने उप आयुक्त (आरोग्य) डॉ.वैभव विधाते व शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या आकांक्षित स्वच्छता गृहांची उभारणी करण्यात आली आहे. हे बांधकाम पूर्ण होण्यासाठी मलनिस्सारण विभाग प्रमुख प्रीतम पाटील, शौचालय अधिक्षक भावेश चंदने, अभियंता प्रीतीश पगारे, मयूर शिरोळे, राकेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.